# ‘सर्व मेट्रो प्रकल्प २०२६ पर्यंत पूर्ण होतील’

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई\नवी दिल्ली** : मुंबईतील मेट्रो रेल्वेचे सर्व नऊ प्रकल्प पूर्ण होण्यासाठी आणखी तीन वर्षे म्हणजे ऑक्टोबर २०२६ पर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे.

मुंबई मेट्रो लाइन-३ (जून २०२४), मुंबई मेट्रो लाइन-२बी (जून २०२५), मुंबई मेट्रो लाइन-४, मुंबई मेट्रो लाइन-४ ए, मुंबई मेट्रो लाइन-६ आणि मुंबई मेट्रो लाइन-९/७ ए ( डिसेंबर २०२५), मुंबई मेट्रो लाइन-४ (जून २०२६) तर मुंबई मेट्रो लाइन-१० आणि मुंबई मेट्रो लाइन-



१२ (ऑक्टोबर २०२६) मध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे, असे केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी विकास मंत्री हरदीपसिंह पुरी यांनी लोकसभेत शिवसेनेचे गजानन कीर्तीकर व कृपाल तुमाने यांच्या तारांकित प्रश्नाच्या उत्तरात सांगितले.